# सहकारी संस्थांसाठी अटल अर्थसहाय्य योजना

## माहिती व प्रस्तावना

- ❖ **दिनांक 02 जानेवारी 2019 पासून कार्यान्वित**
- ❖ **योजना अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्या., पुणे ही "नोडल एजन्सी" म्हणून नियुक्त**

- **प्रस्तावना :-**
  - ❖ सहकार पणन व वस्त्रोदयोग विभाग शासन निर्णय - दिनांक: 02 जानेवारी 2019.
  - ❖ नोडल एजन्सी - महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ (महाराष्ट्र शासनाची अंगीकृत कंपनी).
  - ❖ सदर योजना सन 2014-2015 पासून नोंदणीकृत सहकारी संस्थासाठी कार्यान्वित.

- **योजनेचा उददेश :-**

1) सहकाराच्या माध्यमातून कृषी व बिगर कृषी क्षेत्राशी संबंधीत विविध नाविण्यपूर्ण व्यवसाय / प्रकल्प प्रोत्साहन देऊन कार्यान्वित करणे.
2) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती करणे.
3) शेतकऱ्यांच्या शेतमालावर प्राथमिक व दुय्यम प्रक्रिया करून मुल्यवर्धन करणे.
4) शेतमाल उत्पादनांतून शेतक-यांचा नफा वाढविण्यासाठी तसेच शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी सहकारी संस्थांना प्रोत्साहन देणे.
5) जागतिक बाजारेपेठेत कृषी व पूरक उदयोगांस वाव असलेले उदयोग सुरू करण्यासाठी सहकारी संस्थांना प्रोत्साहन देणे.
6) राज्यातील विशेषत: ग्रामीण भागातील सुशिक्षीत तरूणांनी सहकारी संस्थामार्फत कृषी क्षेत्राशी व स्थानिक गरजेशी संबंधीत सेवा, व्यवसाय व उदयोग उभे करणे.
7) सहकारी संस्थांच्या पुढाकारातून प्राथमिक प्रक्रिया, शेतमाल साठवणूक, दुय्यम प्रक्रिया, शेतमाल वाहतूक, कृषी निविष्ठा पुरवठा, शुध्द पाणी पुरवठा व अन्य नाविण्यपूर्ण सुगी पश्चात कृषी व्यवसाय सुरू करण्यास प्रोत्साहन देवून त्याव्दारे आर्थिक दुर्बल घटकांचे सक्षमीकरण करणे.

- **अर्थसहाय्याचे स्वरूप :-**
  प्रत्येक जिल्हयामध्ये वितरीत करावयाच्या रक्कमेपैकी किमान 50 टक्के अर्थसहाय्याची रक्कम कृषी प्रकल्पासाठी व उर्वरीत रक्कम नाविन्यपुर्ण बिगर कृषी प्रकल्पासाठी वितरीत करण्यात येईल.
- सहकारी संस्थेस अनुदानासाठी प्रकल्प किमतीची कमाल मर्यादा रु.20 लाख.
- नक्षल प्रभावित गडचिरोली, चंद्रपूर व गोंदिया या 3 जिल्हयाकरीता प्रकल्प किंमतीच्या अनुदानासाठी कमाल मर्यादा - रु.40 लाख

| | |
|---|---|
| स्वनिधी | - 12.50% |
| कर्ज | - 12.50 % |
| अनुदान | - 75% |
| कर्ज व्याजदर | - 8 % |
| कर्जाची मुदत | - 5 वर्ष |
| विहीत मुदतीत कर्ज परत न केल्यास | - 2% दंडव्याज |

- **प्रस्ताव मंजुरीची कार्यपध्दती :**

**अ) राज्यस्तरीय समिती –**

अध्यक्ष - मा. मंत्री सहकार व इतर सदस्य - मा.सहकार आयुक्त, मा. कृषी आयुक्त, मा. पणन संचालक, मा. कार्यकारी संचालक, मा. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, मा. संचालक आत्मा, सनदी लेखापाल, अशासकीय सदस्य -06 (प्रत्येक महसुल विभागातून 1) व मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्या. सदस्य सचिव.

**आ) जिल्हास्तरीय समिती -**

अध्यक्ष - जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, इतर सदस्य - उपसंचालक कृषी, प्रकल्प संचालक आत्मा, महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, सनदी लेखापाल, अशासकीय सदस्य -4

- **शासनाने मान्यता दिलेल्या प्रस्तावांची माहिती :**

| | | |
|---|---|---|
| एकुण प्रस्ताव | - | 428 |
| प्रकल्प किंमत | - | रु.84 कोटी |
| संस्थेचा स्वनिधी | - | रु. 13 कोटी |
| कर्ज रक्कम | - | रु. 10 कोटी |
| अनुदान | - | रु. 61 कोटी |
| एकुण कर्ज व अनुदान | - | रु.71 कोटी |

- **योजनेशी संबंधित शासन निर्णय -**
  - शासन निर्णय क्र. स 1018/ प्र. क्र. 126/18-स दिनांक 2 जानेवारी 2019 अन्वये सन 2019-2020 पर्यंत शासनाची मान्यता होती.
  - शासन निर्णय क्र. 1118/प्र. क्र. 143/18-स दिनांक 26 फेब्रुवारी 2019 अन्वये रु. 80 कोटी निधीचे वितरण करुन खर्च करण्यास शासन मान्यता देण्यात आली.
  - शासन निर्णय क्र. अर्थसं-2020/प्र. क्र.65/अर्थ-3 दिनांक 4 मे 2020 अन्वये सदरनिधी शासनास समर्पीत.
  - शासन निर्णय क्र. बैठक - 1222/प्र.क्र.199/18-स, दिनांक 23 जानेवारी 2023 अन्वये सदर योजनेस सन 2020-21 ते 2022-23 पर्यंत पूर्वलक्षी प्रभावाने तसेच सन 2023-24 करीता मुदतवाढ देणेबाबत मान्यता.
  - शासन निर्णय क्र. पूरक 0223/प्र.क्र.35/18-स, दिनांक 31 मार्च 2023 अन्वये 428 संस्थांसाठी कर्ज व अनुदान वितरणासाठी तसेच 2% प्रशासकीय शुल्क असे एकूण रु.72.42 कोटी महामंडळास वितरीत करणेस मान्यता.
  - शासन निर्णय क्र. संकिर्ण-0224/प्र.क्र.49/18-स, दिनांक 24 जून, 2024 अन्वये सदर योजनेस सन 2024-25 करीता मुदतवाढ देणेबाबत मान्यता.

- **सद्यस्थिती -**

1. शासन निर्णय दिनांक 31 मार्च 2023 नुसार निधीची उपलब्धता- 72.42 कोटी
2. 428 पैकी 320 संस्थांचे कर्ज मागणी प्रस्ताव प्राप्त असून त्यावर पुढील कार्यवाही सुरु आहे.
3. 320 पैकी 185 संस्थांना कर्ज रक्कम **रु. 3.64/-** कोटी वितरीत करणेत आले आहे.
4. 185 पैकी 120 संस्थांना **रु. 13.75/-** कोटी अनुदान रक्कम वितरीत करणेत आले आहे.